जा.क्र.पोउपआ/वाह/नमुं/९७८/२०२१,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक यांचे कार्यालय,
खोली क्रमांक ७३२, सातवा मजला,
कोकण भवन विस्तारित इमारत,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई दि. २१/०६/२०२१
दूरध्वनी क्र. ०२२-२७५६ २२८८.
*Email ID.-dcptraffic.nm@mahapolice.gov*

## <u>वाहतूक नियंत्रण अधिसुचना</u>

ज्याअर्थी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत दिनांक २४/०६/२०२१ रोजीचे संभाव्य कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. यादृष्टीने सकाळी ०८:०० वा ते रात्रौ २०:०० वा. पर्यत नवी मुंबईमध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांची वाहतूक पुर्णत: बंद करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी सायन-पनवेल महामार्गावर उरणफाटा ते खारघर दरम्यान दोन्ही मार्गीकेवर तसेच सीबीडी सर्कलकडे येणारे रस्ते १) किल्ला जंक्शनकडुन दिवाळेमार्गे, २) सीबीडी महाकाली चौकाकडुन, ३) पार्क हॉटेलकडुन व ४) जुने महानगरपालिका कार्यालयाकडुन या रस्त्यावरील सर्व प्रकारची वाहतूक सकाळी ०८:०० वा ते रात्रौ २०:०० वा.चे दरम्यान पुर्णत: बंद ठेवुन पर्यायी मार्गाने वळवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी दिनांक २४/०६/२०२१ रोजी सकाळी ०८:०० वा ते रात्रौ २०:०० वा. पर्यत नवी मुंबई हदद्दीत येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांची वाहतूक पुर्णत: बंद तसेच सायन-पनवेल महामार्गावरुन उरणफाटा ते खारघर दरम्यान दोन्ही मार्गीकेवरील तसेच सीबीडी सर्कलकडे येणारे रस्ते १) किल्ला जंक्शनकडुन, २) सीबीडी महाकाली चौकाकडुन, ३) पार्क हॉटेलकडुन व ४) जुने महानगरपालिका कार्यालयाकडुन या रस्त्यावरील सर्व प्रकारचे वाहनांना प्रवेश बंद करावा लागणार आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.-११६/सीआर/३७/टीआर/दि.२७.०९.१९९६चे अधिसूचने नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी पुरुषोत्तम कराड, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**नवी मुंबईमध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांची वाहतूक <u>''पुर्णत: बंदी''</u> तसेच सायन पनवेल मार्गावरुन सीबीडी मार्गे पुणेकडे तसेच मुंबईकडे जाणारे-येणारे दोन्ही मार्गीकेवर उरणफाटा ते खारघर दरम्यान तसेच सीबीडी सर्कलकडे येणारे रस्ते १) किल्ला जंक्शनकडुन, २) सीबीडी महाकाली चौकाकडुन, ३) पार्क हॉटेलकडुन व ४) जुने महानगरपालिका कार्यालयाकडुन या रस्त्यावरील सर्व प्रकारचे वाहनांना दिनांक २४/०६/२०२१ रोजी सकाळी ०८:०० वा. ते रात्रौ २०:००वा. पर्यत <u>''प्रवेश बंदी''</u> घोषित करण्यात येत आहे.**

- **मुंबई - पुणे जाणारी हलकी वाहतूक**

**पर्यायी मार्ग :-**

१) मुंबई कडुन येणारी वाहने ऐरोली टोल मार्गे-महापे -शिळफाटा यामार्गाने कळंबोली सर्कल मार्गे पुणेकडे जाईल.

२) वाशी येथुन पामबिच मार्गे-ऑरेंजा सर्कल-बोनकोडे मार्गे- फायरब्रिगेट- महापेब्रिज-शिळफाटा मार्गे-कळंबोली सर्कल मार्गे पुणेकडे जाईल .

- **पुणे - मुंबई येणारी हलकी वाहतूक**

<u>**अ)** एक्सप्रेस वे वरील वाहतूक :-</u>

**पर्यायी मार्ग :-**

१) पुरुषार्थ पेट्रोल पंप येथुन उजवीकडे तळोजा MIDC कडे जाणारे रोडने रोडपाली येथुन डावीकडे वळण घेवुन शिळफाटा -महापे- ऐरोली टोल मार्गे मुंबईकडे जाईल .

<u>**ब)** जुना पुणे-मुंबई व मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक:-</u>

**पर्यायी मार्ग :-**

१) पळस्पेफाटा-डी पाईट-कळंबोली सर्कल - शिळफाटा मार्गे- महापे-ऐरोली टोल मार्गे मुंबईकडे जाईल.

**क)** <u>सीबीडी अंतर्गत असलेल्या सेक्टर मधील वाहतूक</u> :-

**पर्यायी मार्ग :-**

१) MGM हॉस्पीटल समोरील महाकाली चौक-भारतीय विद्यापीठ समोरील रोडने उत्सव चौक-खारघर मार्गे इच्छित ठिकाणी जाईल .

२) किल्ला जंक्शन येथुन उरणफाटा येथुन सायन-पनवेल मार्गाने इच्छित ठिकाणी जाईल .

**ड)** <u>नवी मुंबई मधुन पुणेकडे जाणारी वाहतूक</u> :-

**पर्यायी मार्ग :-**

१) पामबिच मार्गे-ऑरेजा सर्कल-बोनकोडे मार्गे- फायरब्रिगेट- महापेब्रिज मार्गे-शिळफाटा मार्गे-कळंबोली सर्कल मार्गे पुणेकडे जाईल.

२) बेलापुर-ठाणे मार्गे फायरब्रिगेट- महापेब्रिज मार्गे-शिळफाटा मार्गे- कळंबोली सर्कल मार्गे पुणेकडे जाईल.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही जीवनावश्यक वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

सदरची अधिसुचना दिनांक २४/०६/२०२१ रोजी सकाळी ०८:०० वा. ते रात्रौ २०:०० वा. दरम्यान अंमलात राहील.

२१/६/२१.

( **पुरुषोत्तम कराड** )
पोलीस उप आयुक्त, (वाहतूक)
नवी मुंबई

**प्रति,**

मा.संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.

२/- आपणांस विनंती करण्यात येते की, सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी करावी.

प्रत सादर :- मा.जिल्हाधिकारी, ठाणे, रायगड

२/- सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी, दूरदर्शन व आकाशवाणीवर देण्यासाठी.

प्रत :- जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/- सदरच्या अधिसूचनेची प्रसिध्दी करणेस विनंती आहे.

प्रत : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी - वाशी व पनवेल विभाग

प्रत सादर :-
१. मा.आयुक्त, नवी मुंबई
२. मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर
३. मा.पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई
४. मा. चेअरमन, जे.एन.पी.टी.
५. मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका,
६. मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका
७. मा.पोलीस अधीक्षक, रायगड
८. मा.पोलीस अधीक्षक, महामार्ग ठाणे परिक्षेत्र
९. जिल्हा अपत्ती व्यवस्थान, रायगड

प्रत सविनय सादर:- मा.अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य

प्रत सादर :-
१. मा.पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई
२. मा.पोलीस सह आयुक्त, बृन्हमुंबई (वाहतूक)

प्रत : पोलीस उप आयुक्त, परि. १ व २, मुख्यालय, वि.शा., गुन्हे, नवी मुंबई.
पोलीस उप आयुक्त, (वाहतूक) ठाणे शहर

प्रत : सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, नवी मुंबई.

प्रत : सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, नवी मुंबई.

प्रत : मुख्याधिकारी, उरण नगरपालिका, उरण.

प्रत : पोलीस निरीक्षक, प्रशासन व नियोजन, वाहतूक विभाग, नवी मुंबई.

प्रत : सर्व प्रभारी युनिट अधिकारी, वाहतूक शाखा, नवी मुंबई.